N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** औरंगाबाद शहर **P.S.(ठाणे):** क्रांति चौक **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0078 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 13/03/2020 23:26 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 13/03/2020

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 13/03/2020

**Time From (वेळेपासून):** 13:35 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 13:50 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 13/03/2020 **Time (वेळ):** 23:00 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 034 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 13/03/2020 23:16 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पूर्व, 2 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** घनं-33, श्रीनिकेतन कॉलनीऔरंगाबाद

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** गणेश रमेश तांबे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(ग) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | शहाजतपुर,वैजापुर जि ,औरंगाबाद,क्रांति चौक,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | शहाजतपुर,वैजापुर जि ,औरंगाबाद,क्रांति चौक,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.): 91-9763222269**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विजय सिताराम सरकटे | | | 1. घनं-33,श्रीनिकेतन कॉलनी,,औरंगाबाद, क्रांति चौक,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 च्या 22 नोटा | 11,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 11,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्यादिनांक 13.03.2020मी श्री. गणेश रमेश तांबे, वय 35 वर्षे व्यवसाय शेती, रा. शहाजतपुर ता. वैजापुर जि. औरंगाबाद मो. क्र. 9763222269.दिनांक 11/03/2020 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद कार्यालयात जावुन तक्रार दिली की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन बांधकामाचे साहीत्य पुरवण्याचे काम करतो.आमच्या शहाजतपुर गावातील व्यायाम शाळेचे बांधकामासाठी खासदार निधीमधुन पाच लाख रुपये निधी मंजुर झाला आहे. सदर व्यायाम शाळेच्या बांधकामाकरिता लागणारे साहीत्य जसे वाळु,खडी, विट, स्टील, सिमेंट असे मी ग्रामपंचायतला पुरवीलेले आहे. त्यावरुन ग्रामपंचायत यांनी मला साहीत्य पुरवीले बाबतचे प्रमाण पत्र दिलेले आहे.सदर व्यायाम शाळेच्या बांधकामासाठी 4,42,467/- रुपयांचे बांधकाम साहीत्य पुरवीले होते. त्यापैकी मला 2,21,000/- रुपयाचा चेक ग्रामपंचायत कडुन मिळाला आहे. तरी उर्वरित 2,21,467/- रुपये रक्कम मला ग्रामपंचायत शहाजतपुर यांच्याकडुन येणे बाकी आहे. त्याकरिता मी सरपंच व ग्रामसेवक यांना माझी उर्वरित रक्कम मिळण्यासाठी विनंती केली असता त्यांनी मला सांगीतले की, तुमचा उर्वरीत रक्कमेचा चेक जिल्हा परिषद, औरंगाबाद येथुन येणे बाकी आहे. जर तुम्हाला लवकर चेक काढायचा असेल तर तुम्ही जिल्हा परीषद येथे जाऊन तुमच्या चेकच्या संबधीत टेबलवर जाऊन चौकशी करुन घ्या असे सांगीतलेत्यावरुन मी दि. 09/03/2020 रोजी जिल्हा परिषद औरंगाबाद येथे गेलो असता तेथे मला श्री. सरकटे साहेब इंजीनिअर हे भेटले त्यांनी यापुर्वी मी केलेल्या व्यायाम शाळेच्या कामासंबधाने फाईल तयार करुन दिलेली होती. त्यामुळे आमची ओळख होती. मी केलेल्या व्यायाम शाळेचा बांधकामाची उर्वरीत रक्कम लवकरात लवकर मिळण्यासाठी कोणाला भेटावे लागेल असे विचारले असता त्यांनी मला सांगीतले की, तुला उर्वरीत रक्कमेचा चेक काढायचा असेल तर तुला 20,000/- रुपये मला दयावे लागेल. तु जर 20,000/-रुपये मला दिले तर मी तुझे काम संबधीत अधिकाऱ्यांकडुन करुन देईल. त्यावर मी श्री. सरकटे, यांना म्हणालो 20,000/- रुपये जास्त होतात मी गरीब माणुस आहे. माझ्याकडे पैसे नाहीत. त्यावरुन श्री. सरकटे साहेबांनी कमी करुन तु मला कमीतकमी 11,000/- रुपये दे, तु मला 11,000/- रुपये दिले नाही तर तुला तुझ्या उर्वरीत रक्कमेचा चेक लवकर मिळणार नाही. त्यावेळी मी त्यांना नाईलाजाने हो म्हणुन निघुन आलो. मला श्री. सरकटे, इंजीनीअर व जिल्हापरिषद कार्यालय औरंगाबाद येथील अधीकारी व संबंधीत टेबलचे कर्मचारी यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी आज रोजी लाचलुचपत प्रतिबंध विभाग, औरंगाबाद येथे तक्रार देण्यासाठी आलो आहे. मी श्री. सरकटे यांना आज दिनांक 11/03/2020 रोजी भेटण्यासाठी जाणार असुन मी श्री. सरकटे यांना भेटुन ग्रामपंचायत शहाजतपुरच्या व्यायाम शाळेच्या बांधकामासंदर्भाचा एमबी बील तयार करुन चेक काढण्यासाठी बोलणार आहे. श्री. सरकटे यांचे सोबत माझा देण्या-घेण्याचा अगर उसनवारीचा व्यवहार नाही तसेच वैर अगर दुश्मनी नाही. त्यावेळी मला श्री. सरकटे व जिल्हापरिषद औरंगाबाद येथील अधिकारी व संबंधीत टेबलचे कर्मचारी

यांनी स्वत: किंवा इतरामार्फत लाचेची मागणी करुन स्विकारल्यानंतर त्यांना पकडुन त्यांचेवर योग्य ती कायदेशीर कारवाई करावी हि विनंती. अशी मजकुराची तक्रार दिली होती. त्यावरुन ला.प्र.वि.औरंगाबाद येथील पो.नि. राजपुत यांनी माझी तक्रार टंकलिखीत करुन घेतली व मला कार्यालयात हजर असलेल्या पंचाची ओळख करुन देवुन माझी तक्रार त्यांना सांगीतली होती. त्यावर मी व पो.नि. श्री राजपुत यांनी सहया केल्या. त्यानंतर मला कार्यालयात हजर असलेल्या पंचाची ओळख करुन देवुन माझी तक्रार त्यांना सांगुन त्यांनी ती तक्रार वाचुन त्यावर त्यांच्या सहया केल्या. तक्रारीच्या अनुषंगाने दिनांक 11/03/2020 रोजी लाचेच्या मागणीची पंचासमक्ष पडताळणी करण्यात आली. लाचमागणी पडताळणी दरम्यान माझी व श्री. विजय सरकटे यांची त्यांचे राहते घरी श्रीनिकेतन कलनी औरंगाबाद येथे भेट झाली. त्यावेळी श्री. विजय सरकटे यांनी माझे शहाजतपुर ग्रामपंचायत येथील खासदार निधीतील मंजुर व्यायाम शाळेचे बांधकाम साहित्य पुरविल्याबाबतचे उर्वरीत बील मंजुरी साठी फाईल तयार करुन देवुन संबधीत कर्मचारी व अधिकारी यांच्या सहया घेवुन चेक देण्यासाठी 11,000/- रुपये लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम तात्काळ घेवुन येण्यास सांगीतले. त्यानंतर मी श्री सरकटे यांना त्यांचे मोबाईलवर संपर्क करुन लाचेची रक्कम कोठे घेवुन येवु याबाबत विचारले असता ते पडेगाव येथे असल्याचे सांगुन दिनांक 12/03/2020 रोजी सकाळी लाचेची रक्कम घेवुन येण्याचे सांगीतले मी त्यांना दुसऱ्या दिवशी दिनांक 12/03/2020 रोजी श्री सरकटे यांना त्यांचे मोबाईलवर संपर्क केला असता त्यांच्याकडुन त्यांचे सासरे मयत झाल्याने ते बाहेरगावी गेले असल्याचे समजले तसेच श्री. सरकटे यांनी मला दिनांक 13/03/2020 रोजी सकाळी आकरा वाजेचे दरम्यान लाचेची रक्कम घेवुन येण्याबाबत सांगीतले आहे. त्याप्रमाणे मला पोलीस निरीक्षक श्री. संदिप राजपुत यांनी सदर प्रकरणाबाबत गोपनीयता बाळगण्याचे सुचना देवुन दि. 13/03/2020 रोजी सकाळी 11.00 वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद येथे लाचेच्या रक्कमेसह हजर राहण्याचे कळविले. पोलीस निरीक्षक श्री. संदिप राजपुत यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी दिनांक 13/03/2020 रोजी सकाळी 11.00 वाजता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद येथे हजर आलो. तेव्हा पोलीस निरिक्षक श्री. संदिप राजपुत यांचे सुचनेवरुन मी व पंच क्र. 1 निसार अहेमद शहा असे आम्ही माझ्या खाजगी दुचाकी वाहनाने तर पोलीस निरिक्षक श्री. राजपुत पंच क्र. 2 श्री. गटकाळ व सापळा पथक हे शासकिय वाहनात बसुन श्रीनिकेतन कलनीचे परिसरात सुरक्षीत अंतरावर येवुन थांबलो त्यानंतर पोलीस निरिक्षक श्री. राजपुत यांनी सापळा कार्यवाही संबधाने थोडक्यात सुचना देवुन ऍन्थासिन पावडरचे गुणधर्म समजावुन सांगुन त्यांचे सुचनेवरुन लाचेची रक्कम 11,000/- रुपये माझे पन्टचे उजव्या बाजुचे खिशात ठेवले. त्यानंतर व्हाईस रेकर्डर चालु करुन माझेकडे देवुन पंचासोबत रवाना केले. त्यानंतर सापळा पथकातील अधिकारी व कर्मचारी श्रीनिकेतन कलनी मधील घर क्र.33 च्या आजुबाजुला दबा धरुन थांबले. माझी व श्री. सरकटे यांची त्यांचे घरी भेट होवुन लाचेची रक्कम स्विकारल्यानंतर 13.35 वा. मी पुर्वनियोजीत ईशारा केला असता सापळा पथकातील अधिकारी कर्मचारी व पंच क्र. 2 असे घटनास्थळी हजर आले. पोलीस निरीक्षक श्री. राजपुत यांनी श्री. विजय सरकटे यांना त्यांचा परिचय देवुन त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री. विजय सिताराम सरकटे, वय 58 वर्षे, सेवा निवृत्त शाखा अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उप विभाग, वैजापुर जिल्हा औरंगाबाद रा. घर नं. 33 श्रीनिकेतन कलनी, औरंगाबाद असे असल्याचे सांगीतले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. राजपुत, स्टाफ, दोन्ही पंच, मी व श्री. विजय सरकटे असे तिथुन निघुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद येथे आलो. सर्व घटनेबाबत सविस्तर पंचनामा करण्यात आला.दिनांक 13/03/2020 रोजी 13.35 वाजेच्या आरोपी श्री. विजय सिताराम सरकटे यांनी माझे शहाजतपुर ग्रामपंचायत येथील खासदार निधीतील मंजुर व्यायाम शाळेचे बांधकाम साहित्य पुरविल्याबाबतचे उर्वरीत बील मंजुरीसाठी फाईल तयार करुन देवुन संबधीत कर्मचारी व अधिकारी यांच्या सहया घेवुन चेक देण्यासाठी 11,000/- रुपये लाचेची मागणी करुन पंचासमक्ष स्विकारली म्हणुन माझी त्यांचे विरुध्द फिर्याद आहे. हि फिर्याद दिली गुन्हा दाखल करुन पुढील तपास पोनि संदीप राजपुत ला.प्र.वि.औरंगाबाद हे करीत आहेत

**13.Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** **(केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** Nirmala Mansing Pardeshi(I (Inspector)) / POBN74842 **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):**

**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

**(3) Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

**(4) Transferred to P.S.(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.** (तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Ganesh Tambe

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Raut

डि. ओ. अधिकारी
पोलीस ठाणे क्रान्ती चौक
औरंगाबाद (श.)

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name (नाव):** Nirmala Mansing Pardeshi
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN74842